महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २५८ वे | दिनांक : १४/०९/२०२६ | वार : सोमवार

## मोदींच्या वाढदिवशी भाजपचा मास्टरप्लॅन; महिनाभर ‘सेवा संकल्प’



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 25 वर्षांच्या राजकीय प्रवासानिमित्त भारतीय जनता पक्षाकडून देशभरात विशेष अभियान राबवण्यात येणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेत ‘सेवा संकल्प अभियान’ची घोषणा केली. येत्या 17 सप्टेंबर ते 17 ऑक्टोबर 2026 या कालावधीत देशभरात हे अभियान राबवण्यात येणार असून, त्याअंतर्गत विविध सेवाभावी आणि लोककल्याणकारी उपक्रम आयोजित केले जाणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून या अभियानाला सुरुवात होणार आहे. यंदा मोदींचा वाढदिवस केवळ उत्सव म्हणून न साजरा करता विविध सामाजिक पक्रमांच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याचे अमित शाह यांनी सांगितले. ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत देशभरात 12 वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले जाणार असल्याची माहिती अमित शाह यांनी दिली. यामध्ये रक्तदानासह विविध सामाजिक आणि सेवाभावी उपक्रमांचा समावेश असेल. भाजपचे कार्यकर्ते आणि सरकारच्या माध्यमातून जनतेमध्ये जाऊन हे कार्यक्रम राबवले जाणार आहेत. या अभियानाची माहिती देण्यासाठीच मुंबईत पत्रकार परिषद आयोजित करण्यात आल्याचे अमित शाह यांनी स्पष्ट केले. यापूर्वी पंतप्रधान मोदी यांचा वाढदिवस गुजरातमध्ये विशेष पद्धतीने साजरा केला जात होता. त्यानंतर हा उत्सव देशभरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा केला जाऊ लागला. मात्र, यंदा मोदींच्या सार्वजनिक जीवनातील 25 वर्षांचा महत्त्वाचा टप्पा लक्षात घेऊन विशेष स्वरूपात हे अभियान राबवले जाणार आहे. नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील 25 वर्षांचा टप्पा हा महत्त्वाचा असल्याचे अमित शाह यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री आणि त्यानंतर पंतप्रधान म्हणून मोदी यांनी दीर्घकाळ देशाच्या नेतृत्वाची जबाबदारी सांभाळली आहे. राज्याच्या मुख्यमंत्रीपदापासून देशाच्या पंतप्रधानपदापर्यंतचा प्रवास करत सातत्याने देशाचे नेतृत्व करणारे नेते देशात फार कमी असल्याचे शाह यांनी नमूद केले. मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने गेल्या काही वर्षांत केलेली प्रगतीही शाह यांनी अधोरेखित केली. त्यामुळे त्यांच्या सार्वजनिक जीवनातील या टप्प्याच्या निमित्ताने विविध सेवाभावी कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुंबईतील पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही ‘सेवा संकल्प अभियान’बाबत माहिती दिली. नरेंद्र मोदी यांनी 25 वर्षे देशाच्या प्रमुख पदांवर राहण्याचा विक्रम केला असल्याचे फडणवीस म्हणाले. गेल्या 12 वर्षांपासून ते भारताचे पंतप्रधान म्हणून देशाचे नेतृत्व करत आहेत. या काळात भारताने केलेली प्रगती सर्वांनी जवळून पाहिली असल्याचे त्यांनी सांगितले. मोदी यांच्या राजकीय कारकिर्दीत ‘सेवा भाव’ हा स्थायी भाव राहिला, असे फडणवीसांनी म्हटले. राजकारणापेक्षा सेवा आणि गरीब कल्याणाला प्राधान्य देण्याचा अजेंडा मोदी यांनी सातत्याने पुढे नेल्याचा दावाही त्यांनी केला. ‘सेवा संकल्प अभियान’ केवळ पक्षाचा कार्यक्रम न राहता जनतेशी थेट जोडला जाणार असल्याचे फडणवीसांनी स्पष्ट केले. या अभियानाच्या माध्यमातून सरकार तसेच भाजपचे कार्यकर्ते थेट जनतेमध्ये जाऊन विविध सेवाभावी उपक्रम राबवणार आहेत. सामान्य नागरिकांच्या जीवनात प्रत्यक्ष आणि सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने या अभियानातील कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे केवळ औपचारिक कार्यक्रम न घेता लोकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित उपक्रमांवर भर दिला जाणार असल्याचे फडणवीसांनी सांगितले. महाराष्ट्र सरकारकडूनही ‘सेवा संकल्प अभियान’च्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी शासन निर्णय काढण्यात आल्याची माहिती फडणवीसांनी दिली.

## 1 कोटींची लाच; पनवेलचा CGST अधीक्षक अटकेत

**नवी दिल्ली :** खासगी रिअल इस्टेट कंपनीच्या प्रकल्पाला ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) देण्यासाठी तब्बल १ कोटी रुपयांची लाच मागणारे सीजीएसटी आणि केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक पंकजकुमार तसेच सल्लागार प्रसाद स्वामी यांना सीबीआयने अटक केली आहे. त्यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

नवी पनवेलमधील सेक्टर १७ मध्ये दोन इमारतींचे पुनर्विकासाचे काम सुरू आहे. यामध्ये सीजीएसटी व केंद्रीय उत्पादन शुल्कच्या मालकीच्या २४ सदनिका आहेत. या सदनिकांचे हस्तांतरण आणि एनओसीसाठी अधीक्षक पंकजकुमारने १ कोटी रुपये मागितले होते. यातील १० लाखांची लाच सल्लागारामार्फत घेताना सीबीआयने दोघांनाही अटक केली. लाचेत आणखी काही लोकांच्या सहभागाची शक्यता आहे.

**दिल्लीच्या कार्यालयातील अधिकारी लाचेत वाटेकरी**

पंकजकुमारने १० सप्टेंबरला १० लाख रु. रोख, एका फ्लॅटसाठी २० लाख रुपये डाऊन पेमेंट आणि उर्वरित ७० लाख रुपये नंतर नवी दिल्लीतील डीजी एचआरडी सीजीएसटीच्या अधिकाऱ्यांसाठी मागितल्याचे उघड झाले. या अधिकाऱ्यांचीही चौकशी होऊ शकते.

## लिलाव न झालेले वाळू घाट आता घरकुलांसाठी राखीव

**मुंबई :** घर बांधणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना वेळेत आणि रास्त दरात वाळू उपलब्ध व्हावी, तसेच वाळूमाफियांच्या मक्तेदारीला लगाम बसावा यासाठी राज्य शासनाने वाळू निर्गती धोरणात मोठे फेरबदल केले आहेत. महसूल विभागाने जारी केलेल्या नव्या सुधारित नियमांनुसार, आता वाळू घाटांचा तालुकानिहाय एकत्रित ई-लिलाव होणार असून संपूर्ण प्रक्रियेला कडक कालमर्यादा घालण्यात आली आहे. यामुळे कृत्रिम टंचाई रोखून ग्राहकांना दिलासा देणे आणि महसूल गळती थांबवणे शक्य होणार आहे. यापूर्वी लिलावाच्या दुसऱ्या व तिसऱ्या फेऱ्यांबाबत स्पष्ट नियम नसल्याने स्थानिक पातळीवर स्पर्धा टाळून बोली लांबवली जायची. परिणामी बाजारात वाळूचे भाव गगनाला भिडायचे. आता नव्या तरतुदीनुसार पहिल्या फेरीत किमान ३, दुसऱ्या फेरीत २ आणि तिसऱ्या फेरीत १ पात्र निविदाधारक असणे बंधनकारक असेल. सर्वोच्च बोली लावणाऱ्याने (एच-१) वेळेत पैसे न भरल्यास प्रक्रिया रद्द न करता एच-२ व एच-३ यांना त्याच दराने संधी मिळेल. विशेष म्हणजे, तीन फेऱ्यांनंतरही लिलाव न झालेले वाळू घाट थेट स्थानिक घरकुल व शासकीय कामांसाठी राखीव ठेवले जातील. काळाबाजार आणि दरवाढीला चाप : लिलावांचे कालबद्ध वेळापत्रक निश्चित झाल्यामुळे नदीपात्रातून वाळू वेळेत बाजारात येईल, परिणामी बांधकामासाठी लागणाऱ्या वाळूचे कृत्रिमरीत्या वाढवलेले दर नियंत्रणात येतील. घरकुलांसाठी हक्काची वाळू : लिलाव न झालेले घाट स्थानिक वापरासाठी राखीव ठेवल्याने ग्रामीण भागातील घरकुल योजना आणि वैयक्तिक घरबांधणीसाठी वाळू सहज उपलब्ध होईल. पारदर्शक स्पर्धा : ई-निविदा व ई-लिलाव एकत्र झाल्याने रिंग करून ठरावीक ठेकेदारांची मक्तेदारी निर्माण करण्याच्या प्रकारांना आळा बसेल, असे यातून स्पष्ट होते. पर्यावरण मंजुरी बंधनकारक, त्रुटींसाठी १ दिवस नव्या नियमांनुसार आता केवळ ‘पर्यावरण परवानगी’ मिळालेल्या घाटांचाच तालुकानिहाय एकत्रित लिलाव होईल. तांत्रिक तपासणीत किरकोळ कागदपत्रे अपूर्ण राहिल्यास निविदाधारकांना बाद न करता ‘महाटेंडर’ पोर्टलवर पूर्ततेसाठी १ दिवसाची अतिरिक्त संधी मिळेल. मनमानी कारभाराला चाप लावून पारदर्शक स्पर्धा घडवणे हा उद्देश आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुढाकार घेऊन ‘वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५’ मधील सुधारणांचा अधिकृत शासन निर्णय जारी केला.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १३ सप्टेंबर २०२६


## जिल्हा युवक महोत्सवात शिवाजी महाविद्यालयाचे घवघवीत यश



**कन्नड :** शासकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे ( ता. ११ व १२ ) संपन्न झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय युवक महोत्सवात कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे.या दोन दिवसीय युवक महोत्सवात शिवाजी महाविद्यालयाने तीन पारितोषिके पटकावली आहेत. यामध्ये सुगम गायन - प्रथम क्रमांक, तालवाद्य - प्रथम क्रमांक आणि मिमिक्री - द्वितीय क्रमांक या पारितोषिकांचा समावेश आहे.महाविद्यालयाचा संघ या युवक महोत्सवात सहभागी झाला होता. विविध कला प्रकारात विद्यार्थी कलावंतांनी प्रभावी सादरीकरण केले. या विद्यार्थ्यांना संघ प्रमुख प्रा. डॉ. के. एल. भानुसे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. अलका गडकरी, डॉ. मंगेश जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.ग्रामीण भागातील महाविद्यालय असूनही या युवक महोत्सवात तीन पारितोषिके प्राप्त करून शिवाजी महाविद्यालयाने उल्लेखनीय यश मिळवले आहे.या यशाबद्दल सहभागी विद्यार्थी कलावंतांचे, संघ प्रमुख व सहकार्य करणाऱ्या प्राध्यापकांचे श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक तथा उद्योजक मानसिंग पवार, अध्यक्षा संजिवनी मानसिंग पवार, संस्थेचे सचिव चंद्रकांतराव देशमुख, उपाध्यक्ष डॉ. पी. के. निकम, कोषाध्यक्ष बाबासाहेब माहिते, डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. ए. के. महाले, गौताळा व्हॅली स्कूलचे अध्यक्ष कृष्णा पाटील निकम, संचालक अप्पासाहेब देशमुख, विशाल आहेर, डॉ. रुपेश मोरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. राहुल क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, उपप्राचार्य अभय आहेर, नॅक समन्वयक डॉ. विजय मातकर तसेच सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. मगरे व प्रा. डॉ. मेहत्रे यांना पेटंट; तिफण परिवारातर्फे सत्कार



**कन्नड :** येथील शिवाजी महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. बी. के. मगरे व प्रा. डॉ. आतिष मेहत्रे सर यांना संशोधन कार्यासाठी पेटंट प्राप्त झाल्याबद्दल तिफण परिवारातर्फे आज सत्कार करण्यात आला.मराठी विभाग व महाविद्यालयातील सहकाऱ्यांच्या उपस्थितीत हा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी दोन्ही प्राध्यापकांना पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली आहे. प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमास डॉ. प्रतिभा अहिरे, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. अलका गडकरी, डॉ. एस. बी. कोल्हे, डॉ. संजय भालेराव, डॉ. जे. व्ही. भेलोंडे, डॉ. सुनील गोर्डे, डॉ. प्रशांत संघई, डॉ. सोमेश्वर मोगरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## इकरा पब्लिक स्कूलचे समर्पित शिक्षक शफीक अन्सारी ‘आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**जळगाव :** इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे लोकप्रिय व समर्पित शिक्षक शफीक अन्सारी यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) शिक्षक सेलच्या वतीने प्रदान करण्यात आलेला हा पुरस्कार माजी अर्थमंत्री व आमदार एकनाथरावजी खडसे आणि रोहिणी खडसे-खेवलकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.शफीक अन्सारी हे गेल्या २५ वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात नि:स्वार्थ आणि समर्पित भावनेने सेवा बजावत आहेत.आपल्या प्रदीर्घ अध्यापन कारकिर्दीत त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार आणि शिस्तीची दिशा दिली आहे.अत्यंत शांत, विनम्र, शालीन आणि शिस्तप्रिय स्वभावामुळे ते विद्यार्थ्यांमध्ये विशेष लोकप्रिय आहेत.अध्यापनासोबतच ते एक कुशल कातिब म्हणूनही परिचित असून, आपल्या लेखनकलेतून त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे.मेहनत, जिद्द, चिकाटी आणि अध्यापनाविषयीच्या आवडीने ते विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने कार्यरत आहेत.शफीक अन्सारी यांना मिळालेला हा सन्मान केवळ त्यांच्यासाठीच नव्हे, तर इकरा पब्लिक स्कूल परिवार, सहकारी शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठीही अभिमानाची बाब आहे.या पुरस्काराबद्दल संस्थेचे चेअरमन डॉ.अब्दुल करीम सालार,जनरल सेक्रेटरी एजाज मलिक आणि प्राचार्य शेख शकील यांनी शफीक अन्सारी यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचे त्यांचे कार्य यापुढेही याच निष्ठेने सुरू राहावे आणि त्यांनी यशाचे नवनवे मानदंड प्रस्थापित करावेत,अशा शुभेच्छाही व्यक्त करण्यात आल्या

## श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेची १७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न; १०० कोटी ठेवींचे उद्दिष्ट निश्चित



**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेची १७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रत्नमाला मंगल कार्यालयात शनिवारी (ता. १२) रोजी उत्साहात पार पडली. संस्थेचे चेअरमन शिवशरण वरनाळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत आगामी काळात संस्थेच्या वतीने १०० कोटी ठेवींचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट गाठण्याचा संकल्प करण्यात आला. प्रारंभी महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शाखाधिकारी दत्तात्रय कांबळे यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले, ज्यास उपस्थित सभासदांनी सर्वसम्मती दिली.आर्थिक प्रगतीचा लेखाजोखाचेअरमन शिवशरण वरनाळे यांनी प्रास्ताविकात ३१ मार्च २०२६ पर्यंतच्या ताळेबंद आणि नफातोट्याचा सविस्तर तपशील मांडला. त्यानुसार, चालू आर्थिक वर्षात पतसंस्थेस ३६ लाख २६ हजार ८०६ रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. संस्थेच्याठेवी १५ कोटी ९३ लाख ६५ हजार ६४७ रुपये, कर्ज वाटप १२ कोटी ८३ लाख ६१ हजार ९५६ रुपये, गुंतवणूक ६ कोटी २३ लाख ९२ हजार ६९३ रुपये, भाग भांडवल १ कोटी ५० लाख ५५ हजार ६०० रुपये, सभासद संख्या ३८५८ इतकी आहे. संस्थेच्या स्थापनेपासूनच सातत्याने 'अ' वर्ग ऑडीट दर्जा मिळाला असून, संपूर्ण कामकाज संगणकीकृत आहे. तसेच संस्थेला सलग सहा वर्षापासून मानाचा विभागीय 'दीपस्तंभ' पुरस्कारही प्राप्त झाला असल्याचे त्यांनी सांगितले. ९ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. संचालक मंडळाने भाग भांडवलावर ९ टक्के लाभांश देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सभासदांचा हा लाभांश थेट त्यांच्या बचत खात्यात जमा होत असल्याने, ज्या सभासदांची बचत खाती अजून उघडी नाहीत, त्यांनी लवकरात लवकर खाती उघडून घ्यावीत, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या सभेस उमरगा पंचायत समितीच्या सभापती आकांक्षा चौगुले, शिवसेना नेते भीमराव वरनाळे, चंद्रशेखर मुदकण्णा, आलूरचे जिल्हा परिषद सदस्य अप्पासाहेब पाटील, उपाध्यक्ष शरणप्पा मुदकण्णा, सचिव कमलाकर जाधव, तज्ञ संचालक विजय काशेट्टी, विलास जाधव, धनराज जाधव, राजेंद्र कारभारी, देवराज बिराजदार आदींची प्रमुख उपस्थिती होती.उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच मुरूम येथील आडत व्यापारी शरणप्पा पाताळे यांनी पतसंस्थेच्या ग्रंथालयास ५१ पुस्तके भेट दिली. यावेळी आकांक्षा चौगुले, देवराज बिराजदार यांनी मनोगत व्यक्त केले. संचालक मंडळ, पतसंस्थेचे कर्मचारीवृंद यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन जाधव तर आभार दत्ता इंगळे यांनी मानले. पंचक्रोशीतील बहुसंख्य सभासद, पदाधिकारी आणि नागरिक या सभेस उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १३ सप्टेंबर २०२६


## विघ्नहर्ता गणराया

विराजमान झाले आज
विघ्नहर्ता गणराया
शमीपत्री.दुर्वा वाहून
पडतो तुझ्या पाया

साजिरे गोजिरे
रूप तुझे मनोहर
चौदा विद्यांचा दाता तू
वक्रतुंड गजानन

तुला ओवाळण्यासाठी
आरतीचे सजे ताट
हाती मोदकांची थाळी
काय तुझा थाट

एकदंत विनायक तू
चौसष्ट कलांचा अधिपती
जयजयकार तुझा करूनी
कार्यारंभी तुलाच पुजती

चंदनाचा टीळा कपाळी
भरजरी कटी पितांबर
सोनेरी मुकुट माथी
शोभे तुजला लंबोदर

विनायका तुझ्या चरणी
नमवितो रे माथा
सकलांना सुखी कर
हेची विनवणी एकदंता




**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो. ९०११५५९१०६**


## आपण सारे भाऊ भाऊ

प्राणपणाने लोकशाहीत,
स्वातंत्र्याचे रक्षण करावे.
सर्वधर्म समभाव मानून,
समतेचा ध्वज हाती धरावे. १

माणुसकीने वावरतांना,
जपावा सर्वधर्म समभाव.
प्रत्येकाने समतेने वागावे,
करू नये कधी भेदभाव. २

माणुसकीचे मर्म जाणून,
समतेचा ध्वज उंच धरा.
स्वातंत्र्य,समता,बंधुता,
प्रत्येकाच्या मनात भरा. ३

तुझे माझे नाहीच वैर,
आपण सारे भाऊ भाऊ.
आनंदाने एकत्र येऊन,
समानतेने वाटून खाऊ. ४

चला बंधुतेच्या भावनेने,
हेवे-दावे विसरून जाऊ.
मिळून सारे भाऊ आपण,
संविधानाचे गीत गाऊ. ५




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


# सम्यक पब्लिक स्कूलची निसर्गसहल उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** सम्यक पब्लिक स्कूल, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी दरेगाव दरी, ता. फुलंब्री येथे निसर्गसहलीचे आयोजन करण्यात आले. निसर्गाच्या सान्निध्यात विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळावे, हा या सहलीमागील मुख्य उद्देश होता.या निसर्गसहलीदरम्यान विद्यार्थ्यांना शेतीतील विविध पिके, झाडे-वनस्पती, पर्वतावरील वनस्पती, विविध पशुपक्षी तसेच निसर्गातील जैवविविधता यांची प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध वनस्पती व पशुपक्ष्यांचे महत्त्व, पर्यावरण संवर्धन आणि निसर्गाचे संरक्षण याबाबत मार्गदर्शन केले.यानंतर विद्यार्थ्यांनी उत्साहाने पर्वतावरील ट्रेकिंगचा रोमांचक अनुभव घेतला. डोंगर-दऱ्यांमधून निसर्गाचा मनमुराद आनंद घेताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्साह आणि आनंद ओसंडून वाहत होता. अभ्यासासोबतच साहस, निरीक्षणशक्ती, निसर्गप्रेम आणि पर्यावरणाविषयीची जाणीव निर्माण करणारी ही सहल विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरली.ही निसर्गसहल यशस्वी करण्यासाठी सम्यक पब्लिक स्कूलमधील सर्व शिक्षक-शिक्षिका तसेच शिक्षकेतर परिश्रम घेतले.

# जिंतूर येथे अखिल भारतीय ग्राहक पंचायत बैठक



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** अखिल भारतीय ग्राहक पंचायत, जिंतूर तालुका शाखेची बैठक शनिवारी दुपारी २:०० वाजता उत्साहात पार पडली. या बैठकीत परभणी जिल्हा पालक अधिकारी तथा देवगिरी प्रांत पर्यावरण प्रमुख डॉ. सौ. संगीता अवचार यांनी उपस्थितांना पर्यावरण संवर्धनाविषयी सविस्तर मार्गदर्शन करत नागरिकांनी पर्यावरणाचे रक्षण करण्याचे आवाहन केले.आपल्या मार्गदर्शनात डॉ. संगीता अवचार म्हणाल्या, "नागरिकांनी अनावश्यक वस्तू खरेदी करण्याचा मोह टाळला पाहिजे, कारण अतिरिक्त उपभोग आणि नको असलेल्या वस्तूंच्या निर्मितीमुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होतो. अनेक व्यापारी 'एका वस्तूवर दोन फ्री' अशा ऑफर्स देतात. मात्र अशा ऑफर्सला न भुलता वस्तूची गुणवत्ता आणि तिची प्रत्यक्ष गरज तपासूनच खरेदी करावी."या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जिंतूर तालुका अध्यक्ष मंचक देशमुख यांनी भूषवले. ग्राहक सभासद नोंदणीचे उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल संपूर्ण टीमचे अभिनंदन करण्यात आले व मंचक देशमुख यांचा विशेष सत्कार करण्यात आला.बैठकीस प्रमुख पाहुणे म्हणून परभणी जिल्हा अध्यक्ष गुलाबराव शिंदे उपस्थित होते. यावेळी देवगिरी प्रांत विधी आयाम प्रमुख ॲड. संजय केकन यांनी महावितरण/विद्युत वितरण विषयावर तसेच मध्यस्थी संदर्भात सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन केले.या बैठकीला जिंतूर तालुक्यातील पदाधिकारी चंद्रकांत गवळी, सचिन रायपत्रीवार, आबासाहेब जाधव, प्रल्हाद टाकरस, श्याम रेघाटे, प्रभाकर डोईफोडे, आशाताई खिल्लारे यांच्यासह ग्राहक पंचायतीचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीकांत गवळी यांनी केले.कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्ष मंचक देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १३ सप्टेंबर २०२६

## कन्नडच्या शिवाजी महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी प्रा. सोनाली शिंदे यांची गरुडझेप



**कन्नड :** शिक्षण, चिकाटी आणि साहित्यावरील निस्सीम प्रेम यांच्या बळावर यशाचे शिखर कसे गाठता येते, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे कन्नडच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभागाची माजी विद्यार्थिनी प्रा. सोनाली शिंदे-गरुड.कन्नडच्या या कन्येने मराठी विषयात विशेष रुची जोपासत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून पीएच. डी. सारखी सर्वोच्च पदवी संपादन करून आपल्या महाविद्यालयाच्या आणि कन्नडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्यांच्या या गरुडझेपेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.शिवाजी महाविद्यालयापासून पुणे विद्यापीठापर्यंतचा प्रेरणादायी प्रवासप्रा. सोनाली शिंदे या मूळच्या कन्नडच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या विद्यार्थिनी. महाविद्यालयात पदवीचे शिक्षण घेत असतानाच त्यांना मराठी साहित्य, समीक्षा, वैचारिक लेखन आणि संशोधनाची विशेष गोडी होती. वर्गात त्या केवळ एक हुशार विद्यार्थिनी नव्हत्या, तर मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवण्याची त्यांची धडपड शिक्षकांनाही जाणवायची. मराठी विषयात त्यांना असलेली हीच विशेष रूची हीच त्यांना पुढे संशोधनाच्या वाटेवर घेऊन गेली.सध्या त्या डॉन बॉस्को उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी विषयाच्या अध्यापिका म्हणून कार्यरत असल्या तरी, त्यांनी आपला विद्यार्थीभाव कधीच सोडला नाही. एकीकडे अध्यापनाची जबाबदारी, दुसरीकडे कुटुंबाची जबाबदारी आणि तिसरीकडे संशोधनाचा ध्यास, या तिन्ही आघाड्या त्यांनी अत्यंत समर्थपणे आणि जिद्दीने सांभाळल्या. अनेक अडचणींवर मात करत त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मानवविज्ञान शाखेअंतर्गत आपला संशोधन प्रबंध पूर्ण केला. विद्यापीठाने त्यांच्या प्रबंधाला मान्यता देत त्यांना मराठी विषयात पीएच. डी. पदवी प्रदान केली आहे.संशोधनाचा गाभा - आगरकरांच्या विचारांचा चिकित्सक अभ्यासत्यांच्या संशोधनाचा विषय अत्यंत अभ्यासपूर्ण, चिंतनशील आणि समाजोपयोगी आहे. "गोपाळ गणेश आगरकर विषयक मराठीतील चरित्रपर लेखनाचा अभ्यास" या विषयावर त्यांनी आपले संशोधन केले आहे.थोर समाजसुधारक, तत्त्वज्ञ आणि निर्भीड पत्रकार गोपाळ गणेश आगरकर हे महाराष्ट्राच्या प्रबोधन पर्वातील तेजस्वी नक्षत्र आहेत. कर्मठता, अंधश्रद्धा, जातिभेद, बालविवाह, केशवपन यांसारख्या अनिष्ट रूढींवर त्यांनी आपल्या 'सुधारक' या वृत्तपत्रातून कडाडून हल्ला चढवला. केवळ टीका न करता, बुद्धिप्रामाण्यवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, विवेकनिष्ठा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन हा त्यांच्या विचारांचा भक्कम पाया होता.प्रा. सोनाली यांनी आगरकरांवरील मराठीतील चरित्रपर लेखनाचा केवळ आढावा घेतला नाही, तर त्या लेखनामागील सामाजिक, वैचारिक आणि साहित्यिक संदर्भांचा सखोल आणि चिकित्सक अभ्यास केला आहे. मराठीतील विविध लेखकांनी आगरकरांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे सामाजिक कार्य, त्यांचे वैचारिक योगदान आणि आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचे असलेले ऐतिहासिक स्थान कसे मांडले आहे, याचे तुलनात्मक आणि समीक्षात्मक विश्लेषण त्यांनी आपल्या प्रबंधातून केले आहे.आज २१ व्या शतकात समाजात पुन्हा वाढत असलेली अंधश्रद्धा, रूढी-परंपरांचा पगडा आणि अवैज्ञानिक विचारसरणीला छेद देण्यासाठी आगरकरांच्या विचारांची गरज आजही तितकीच महत्त्वाची असल्याचे त्यांनी आपल्या प्रबंधात सप्रमाण अधोरेखित केले आहे. त्यामुळे त्यांचे हे संशोधन केवळ साहित्यिक न राहता, सामाजिक प्रबोधनासाठीही दिशादर्शक ठरणारे आहे.मार्गदर्शन आणि पाठबळकोणतेही मोठे संशोधन हे मार्गदर्शकाच्या भक्कम पाठबळाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. या संशोधन कार्यासाठी सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी संशोधन मार्गदर्शक म्हणून त्यांना अत्यंत मोलाचे आणि अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. डॉ. गावित यांच्या अनुभवी मार्गदर्शनाखालीच हा प्रबंध पूर्णत्वास गेला आणि विद्यापीठाच्या कसोटीवर खरा उतरला.पुणे विद्यापीठात झालेल्या मौखिकीसाठी प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे, पुणे विद्यापीठाचे मराठी विभागाचे प्रमुख डॉ. तुकाराम रोंगटे, डॉ. प्रकाश गरुड आणि मार्गदर्शक प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांची प्रमुख उपस्थिती होती.मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षावप्रा. सोनाली शिंदे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल कन्नडच्या शैक्षणिक आणि साहित्यिक वर्तुळात अभिमान आणि आनंद व्यक्त केला जात आहे.शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, मराठी विभाग व संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. प्रतिभा अहिरे,डॉ. के. एल. भानुसे, प्रा. योगीराज सोमवंशी यांचेसह अनेकांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. आमच्या मराठी विभागाची आणि संशोधन केंद्राची माजी विद्यार्थिनीने मिळवलेले हे यश हे संपूर्ण विभागासाठी आणि महाविद्यालयासाठी भूषणावह असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. मराठी विभागाच्या माजी विद्यार्थिनीने संशोधन क्षेत्रात केलेली ही भरारी इतर विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.तसेच डॉन बॉस्को विद्यालयाचे प्राचार्य फादर अजित मुनीस यांनीही त्यांचे मनापासून कौतुक करून पुढील साहित्यिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.ग्रामीण भागातील एका विद्यार्थिनीने मराठीसारख्या विषयात सातत्य, मेहनत, चिकाटी आणि संशोधनाच्या जोरावर मिळवलेले हे यश निश्चितच आजच्या तरुण पिढीसाठी, विशेषतः उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींसाठी दीपस्तंभासारखे आहे.

## जय गणेश देवा

जय देव जय देव जय गणेश देवा
आलो तुझिया द्वारी तू आम्हां पावा !!ध्रु!!

तूच गणराया विघ्नहर्ता भक्तांचा
कर सुखी आता या साऱ्या जगाला
अज्ञानी बालके आम्हीच तुझी देवा
तूच लाव जगी ज्ञानाचा दिवा!!१!!

प्रसन्नवदना तू देवाधिदेवा
शुभकार्यात सदा तुझा विसावा
तुझ्या डोळ्यात सदा दिसे जिव्हाळा
भक्त गाती सदा तुझा गोडवा!!२!!

दुर्वा आवडे तुला गणेशा
साऱ्या देवाचा तू मुख्य विधाता
पार्वतीचा तू सुपुत्र शोभला
तुझ्या निष्ठेचा जग करी हेवा!!३!!

तुझ्या भक्तीचा आज फुलला मळा
साऱ्या जगाला तू लावला लळा
दु:ख विरले तुझ्या भक्तीत देवा
सारे विश्व वाटे आता सुखाचा ठेवा!!४!!



**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

## डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात एनसीएमसी कार्ड नोंदणी व जनजागृती शिबिर संपन्न





**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा लिगल अॅण्ड जनरल एज्युकेशन सोसायटीचे डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर एलिट यांच्या सहकार्याने नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (NCMC) नोंदणी व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. भारत सरकारच्या महत्त्वाकांक्षी ‘एक देश, एक कार्ड’ या संकल्पनेअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला महाविद्यालयातील विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात सुमारे ८० महिला विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग नोंदवत एनसीएमसी कार्डसाठी नोंदणी केली.या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थिनींना एनसीएमसी कार्डचे महत्त्व, त्याचे उपयोग, कार्ड मिळविण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये त्याचा वापर याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विशेषतः एसटी (राज्य परिवहन) बससेवेतील प्रवास अधिक सुलभ, सोयीस्कर आणि डिजिटल पद्धतीने करण्यासाठी एनसीएमसी कार्ड उपयुक्त ठरणार आहे, याबाबत विद्यार्थिनींमध्ये जनजागृती करण्यात आली.‘एक कार्ड, अनेक सेवा’ या संकल्पनेवर आधारित एनसीएमसी कार्डमुळे दैनंदिन प्रवास अधिक सुलभ करण्याबरोबरच डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन मिळण्यास मदत होते. विद्यार्थिनींना आधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेशी जोडण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये डिजिटल सुविधांविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महाविद्यालयासाठी महत्त्वपूर्ण ठरला.या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल, विद्यार्थी संसद प्रमुख प्रा. डॉ. सुनंदा चक्रानारायण, डॉ. रमा दुधमांडे, प्रा. माधुरी भावसार, प्रा. उज्वला सातदिवे, प्रा. अश्विनी शहाणे, प्रकल्प अध्यक्षा डॉ. सुनीता बाजपाई तसेच रोटरियन स्वाती स्मार्त यांचे विशेष सहकार्य लाभले. रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर एलिटचे पदाधिकारी व सदस्य तसेच महाविद्यालयाचे व्यवस्थापन, प्राचार्य, प्राध्यापकवर्ग आणि कर्मचारी यांच्या सहकार्याने शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.विद्यार्थिनींना शासनाच्या विविध डिजिटल सुविधा व सार्वजनिक सेवा यांची माहिती मिळावी आणि त्यांचा प्रत्यक्ष लाभ घेता यावा, या उद्देशाने महाविद्यालयात भविष्यातही अशा प्रकारचे जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येतील, असे महाविद्यालयाच्या वतीने सांगण्यात आले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १३ सप्टेंबर २०२६


# भारतीय लोकशाही आणि नागरिकांची उदासीनता

दरवर्षी १५ सप्टेंबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन' म्हणून साजरा केला जातो. लोकशाही ही केवळ शासनव्यवस्था नसून स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, मानवी प्रतिष्ठा आणि जनसहभाग यांवर आधारलेली जीवनपद्धती आहे. लोकशाहीमध्ये जनता ही सत्तेचा अंतिम स्रोत मानली जाते. नागरिकांना आपल्या प्रतिनिधींची निवड करण्याचा अधिकार असतो आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींनी जनतेपुढे उत्तरदायी राहणे अपेक्षित असते. भारताने स्वातंत्र्यानंतर लोकशाही प्रजासत्ताकाचा स्वीकार करून विविधतेने नटलेल्या विशाल देशात लोकशाही व्यवस्था यशस्वीपणे रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, स्वतंत्र निवडणूक व्यवस्था, संविधानिक संस्था आणि कायद्याचे राज्य या आधारांवर भारतीय लोकशाहीची वाटचाल झाली. मात्र, लोकशाहीच्या या प्रवासात एक गंभीर आव्हान सातत्याने जाणवते ते म्हणजे नागरिकांची वाढती उदासीनता होय. मतदानापुरते नागरिकत्व मर्यादित राहणे, सार्वजनिक प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे, शासनाच्या कामकाजाची माहिती न घेणे, चुकीच्या माहितीवर सहज विश्वास ठेवणे आणि आपल्या अधिकारांइतकीच कर्तव्येही महत्त्वाची आहेत याची जाणीव कमी होणे, या प्रवृत्ती लोकशाहीसाठी चिंताजनक आहेत. लोकशाही मजबूत करण्यासाठी सक्षम संस्था जितक्या आवश्यक आहेत, तितकाच जागरूक, विवेकी आणि सक्रिय नागरिकही आवश्यक आहे.भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समान राजकीय अधिकार दिले आहेत. धर्म, जात, भाषा, लिंग, आर्थिक स्थिती किंवा सामाजिक पार्श्वभूमी यांचा विचार न करता प्रौढ नागरिकाला मतदानाचा अधिकार देण्यात आला. हा अधिकार केवळ शासन निवडण्याचे साधन नाही, तर नागरिकाच्या राजकीय अस्तित्वाची मान्यता आहे. सामान्य माणसाचे मत आणि सत्तेच्या सर्वोच्च स्तरावरील व्यक्तीचे मत मतदानाच्या प्रक्रियेत समान मूल्याचे असते. हीच राजकीय समानता लोकशाहीचे मूलभूत वैशिष्ट्य आहे. परंतु मतदानाचा अधिकार असूनही जर नागरिकाने निवडणुकीच्या दिवशी मतदान करण्यापलीकडे सार्वजनिक जीवनाशी संबंध ठेवला नाही, तर लोकशाहीतील त्याचा सहभाग अपुरा ठरतो. लोकशाहीमध्ये नागरिक हा केवळ मतदार नसतो; तो शासनाचा निरीक्षक, प्रश्न विचारणारा, सहभागी आणि उत्तरदायित्वाची मागणी करणारा घटक असतो. त्यामुळे नागरिकांची उदासीनता ही केवळ वैयक्तिक बाब नसून लोकशाहीच्या गुणवत्तेशी संबंधित प्रश्न आहे.नागरिकांच्या उदासीनतेचे सर्वांत स्पष्ट उदाहरण म्हणजे सार्वजनिक प्रश्नांपासून दूर राहण्याची प्रवृत्ती होय. आपल्या परिसरातील रस्ते खराब असतील, पाणीपुरवठा अनियमित असेल, सार्वजनिक आरोग्यसेवा अपुरी असेल, शाळांमध्ये सुविधा कमी असतील किंवा सार्वजनिक निधीच्या वापराबाबत प्रश्न निर्माण होत असतील, तरी अनेक नागरिक त्याकडे 'हे सरकारचे काम आहे' या भावनेने पाहतात. शासनाचे काम जनतेसाठी असले तरी शासनाला योग्य प्रश्न विचारणे आणि प्रशासनाकडून उत्तरदायित्वाची अपेक्षा करणे हे नागरिकांचेही कर्तव्य आहे. नागरिकांनी आपल्या परिसरातील प्रश्न समजून घेऊन ग्रामसभा, नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक सुनावण्या आणि उपलब्ध घटनात्मक व कायदेशीर मार्गांचा वापर केला तर लोकशाही तळागाळापर्यंत अधिक प्रभावी होऊ शकते. मात्र, 'आपण काही केले तरी काय बदलणार?' अशी मानसिकता लोकशाहीतील सक्रिय सहभागाला अडथळा निर्माण करते.मतदानाबाबतची उदासीनता हा देखील गंभीर विषय आहे. मतदान हा प्रत्येक पात्र नागरिकाचा महत्त्वपूर्ण अधिकार आहे; परंतु काही नागरिक मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राकडे जाण्याऐवजी आपल्या दैनंदिन कामाला किंवा वैयक्तिक सोयीला अधिक महत्त्व देतात. काही जण राजकारणाबद्दल नाराजी व्यक्त करतात, परंतु त्या नाराजीचे रूप मतदानातून किंवा घटनात्मक सहभागातून व्यक्त करीत नाहीत. 'सर्वच उमेदवार सारखे आहेत', 'माझ्या एका मताने काय फरक पडणार?' किंवा 'राजकारणात काहीच बदलत नाही' अशा भावना लोकशाहीतील निष्क्रियता वाढवतात. प्रत्यक्षात प्रत्येक मत हे लोकशाहीच्या निर्णयप्रक्रियेतील एक महत्त्वाचे साधन आहे. उमेदवारांची माहिती घेणे, त्यांच्या सार्वजनिक भूमिकेचा अभ्यास करणे आणि विवेकपूर्वक मतदान करणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. मतदान न करण्याची उदासीनता ही अप्रत्यक्षपणे इतरांच्या निर्णयाला अधिक प्रभावी बनवू शकते.नागरिकांच्या उदासीनतेमागे राजकीय प्रक्रियेबद्दल निर्माण झालेला अविश्वास हे एक कारण असू शकते. राजकारणातील भ्रष्टाचार, आश्वासनांची पूर्तता न होणे, वाढता निवडणूक खर्च, राजकीय संघर्षातील कटुता किंवा सार्वजनिक संस्थांवरील अविश्वास यामुळे काही नागरिक राजकीय प्रक्रियेपासून दूर जातात. मात्र, लोकशाहीतील त्रुटींवर नाराजी व्यक्त करण्याचा सर्वांत प्रभावी मार्ग म्हणजे लोकशाही प्रक्रियेपासून दूर जाणे नव्हे, तर त्या प्रक्रियेत अधिक सक्रियपणे सहभागी होणे हा आहे. चांगले उमेदवार निवडणे, धोरणांवर चर्चा करणे, प्रश्न विचारणे, लोकप्रतिनिधींशी संवाद साधणे आणि आवश्यकतेनुसार शांततामय व संविधानिक मार्गाने जनमत तयार करणे यामुळे लोकशाहीतील सकारात्मक बदल शक्य होतात. उदासीनता बदल घडवून आणत नाही; जागरूक सहभागच बदलाचे माध्यम बनतो.लोकशाहीतील नागरिकांची उदासीनता ही केवळ मतदानापुरती मर्यादित नसते. अनेक नागरिकांना संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्ये, स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार, शासनाच्या विविध योजनांची माहिती किंवा नागरिकांना उपलब्ध असलेल्या कायदेशीर मार्गांची पुरेशी माहिती नसते. माहितीचा अभाव हा लोकशाहीतील सहभाग कमी करणारा महत्त्वाचा घटक आहे. नागरिकांना आपले अधिकार आणि कर्तव्ये समजली तर ते शासनव्यवस्थेत अधिक प्रभावीपणे सहभागी होऊ शकतात. म्हणून लोकशाही साक्षरता ही सामान्य साक्षरतेइतकीच महत्त्वाची आहे. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि प्रसारमाध्यमांनी नागरिकांना संविधान, लोकशाही प्रक्रिया आणि सार्वजनिक संस्थांविषयी माहिती देण्याचे कार्य अधिक प्रभावीपणे करणे आवश्यक आहे.आजच्या डिजिटल युगात नागरिकांच्या उदासीनतेचे स्वरूप काहीसे बदलले आहे. सामाजिक माध्यमांवर राजकीय विषयांवर मोठ्या प्रमाणावर चर्चा होते. अनेक नागरिक आपले मत व्यक्त करतात, सरकारच्या धोरणांवर प्रतिक्रिया देतात आणि विविध सार्वजनिक प्रश्नांवर भूमिका घेतात. मात्र, सामाजिक माध्यमांवरील सक्रियता आणि प्रत्यक्ष लोकशाही सहभाग यांमध्ये फरक आहे. एखाद्या विषयावर प्रतिक्रिया देणे, संदेश पुढे पाठविणे किंवा एखाद्या छायाचित्रावर मत व्यक्त करणे एवढ्याने लोकशाही सहभाग पूर्ण होत नाही. प्रत्यक्ष जीवनातील सार्वजनिक प्रश्नांमध्ये सहभागी होणे, सत्य माहिती मिळविणे, प्रशासनाकडे प्रश्न मांडणे आणि सामाजिक समस्यांच्या निराकरणासाठी योगदान देणे आवश्यक आहे. आभासी जगातील सक्रियता वास्तविक लोकशाही सहभागाची जागा घेऊ शकत नाही.खोटी माहिती आणि अफवांचा प्रसार ही नागरिकांच्या उदासीनतेशी जोडलेली आणखी एक गंभीर समस्या आहे. माहितीचा स्रोत तपासण्याची सवय नसल्यास नागरिक सहजपणे चुकीच्या प्रचाराला बळी पडू शकतात. विशेषतः निवडणुकीच्या काळात अर्धसत्य, दिशाभूल करणारे संदेश आणि बनावट माहिती लोकमतावर परिणाम करू शकतात. एखादी माहिती आपल्या मताशी जुळते म्हणून ती खरी आहे असे मानणे ही लोकशाहीसाठी धोकादायक प्रवृत्ती आहे. विवेकी नागरिकाने प्रत्येक माहितीचा स्रोत तपासला पाहिजे, अधिकृत माहितीशी तिची पडताळणी केली पाहिजे आणि संशयास्पद माहिती पुढे पाठविणे टाळले पाहिजे. डिजिटल साक्षरता ही आज जबाबदार नागरिकत्वाची अत्यावश्यक अट बनली आहे.नागरिकांची उदासीनता आणि सामाजिक असमानता यांचाही जवळचा संबंध आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ग्रामीण, वंचित किंवा उपेक्षित नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जगण्याच्या प्रश्नांमध्ये इतके गुंतून राहावे लागते की व्यापक सार्वजनिक प्रश्नांमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांच्याकडे वेळ, साधने किंवा माहिती उपलब्ध नसते. त्यामुळे लोकशाहीचा सहभाग केवळ औपचारिक अधिकार देऊन पूर्ण होत नाही. शिक्षण, रोजगार, आरोग्य, सामाजिक सुरक्षा आणि मूलभूत सुविधा यांचा विस्तार झाला तर नागरिकांचा सार्वजनिक जीवनातील सहभागही वाढतो. सामाजिक न्याय आणि लोकशाही सहभाग यांचे नाते त्यामुळे अत्यंत महत्त्वाचे आहे. समाजातील वंचित घटकांचा आवाज निर्णयप्रक्रियेत पोहोचविणे ही लोकशाहीची जबाबदारी आहे.महिलांच्या लोकशाही सहभागाकडेही या संदर्भात पाहणे आवश्यक आहे. महिलांना मतदानाचा अधिकार मिळाल्यानंतरही त्यांच्या राजकीय सहभागाचा विस्तार होण्यासाठी अनेक सामाजिक अडथळे पार करावे लागले. घरगुती जबाबदाऱ्या, सामाजिक रूढी, आर्थिक अवलंबित्व, राजकीय क्षेत्रातील असुरक्षितता आणि निर्णयप्रक्रियेत मर्यादित प्रतिनिधित्व यांमुळे अनेक महिलांचा सार्वजनिक सहभाग अपेक्षेइतका प्रभावी होत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचे प्रतिनिधित्व वाढल्यामुळे तळागाळातील लोकशाहीला नवी दिशा मिळाली आहे. मात्र, प्रतिनिधित्वासोबत निर्णयक्षमता आणि स्वायत्तता वाढणेही आवश्यक आहे. महिलांचा आवाज सार्वजनिक धोरणांमध्ये प्रभावीपणे प्रतिबिंबित झाला तर लोकशाही अधिक समताधिष्ठित बनेल.युवकांची उदासीनता हीदेखील चिंतेची बाब आहे. युवक हा देशाचा मोठा सामाजिक घटक असून लोकशाहीच्या भवितव्यात त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक युवक सामाजिक माध्यमांवर सक्रिय असले तरी प्रत्यक्ष सामाजिक आणि सार्वजनिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग मर्यादित राहतो. राजकीय प्रश्नांचा सखोल अभ्यास करण्याऐवजी क्षणिक लोकप्रियतेवर आधारित मत तयार होणे ही धोकादायक बाब आहे. युवकांनी संविधानाचा अभ्यास करणे, विविध राजकीय विचार समजून घेणे, सार्वजनिक धोरणांचा चिकित्सक अभ्यास करणे आणि सामाजिक कार्यात सहभागी होणे आवश्यक आहे. चर्चासत्रे, संविधान दिनाचे उपक्रम, सामाजिक सेवा आणि स्थानिक प्रश्नांवरील प्रकल्प यांमधून युवकांमध्ये लोकशाहीची जाणीव विकसित करता येऊ शकते.लोकशाहीमध्ये विरोधी मताचा सन्मान करणे हा सक्रिय नागरिकत्वाचा महत्त्वाचा भाग आहे. मात्र, नागरिकांच्या उदासीनतेसोबतच अंधसमर्थनाची प्रवृत्तीही लोकशाहीसाठी धोकादायक आहे. एखादा राजकीय पक्ष किंवा नेता आपल्या आवडीचा आहे म्हणून त्याच्या प्रत्येक निर्णयाला समर्थन करणे ही लोकशाही वृत्ती नाही. त्याचप्रमाणे विरोधी पक्ष किंवा वेगळ्या विचारसरणीतील प्रत्येक भूमिकेला चुकीचे ठरविणेही विवेकपूर्ण नागरिकत्वाचे लक्षण नाही. नागरिकांनी व्यक्तीपेक्षा धोरणे, विचार आणि सार्वजनिक कामगिरी यांचे मूल्यमापन केले पाहिजे. लोकशाहीमध्ये प्रश्न विचारणे हा विरोधाचा नव्हे तर जबाबदार नागरिकत्वाचा भाग आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून नागरिकांच्या उदासीनतेवर प्रभावीपणे मात करता येऊ शकते. ग्रामसभा, नगरपालिका सभा आणि स्थानिक विकास प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. गावातील पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, रोजगार आणि पर्यावरणाशी संबंधित प्रश्न नागरिकांनी सामूहिकपणे मांडले तर प्रशासनावर सकारात्मक दबाव निर्माण होतो. सार्वजनिक निधीचा वापर, विकासकामांची गुणवत्ता आणि योजनांचा लाभ याबाबत माहिती घेण्याचा नागरिकांना अधिकार आहे. स्थानिक पातळीवर सक्रिय नागरिकत्वाची सवय लागली तर राष्ट्रीय पातळीवरील लोकशाही सहभागही अधिक अर्थपूर्ण होतो.लोकशाहीतील नागरिकांची उदासीनता दूर करण्यासाठी शिक्षण आणि मूल्यसंस्कार यांना विशेष महत्त्व आहे. लोकशाहीचे शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकातील धड्यापुरते मर्यादित राहता कामा नये. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष चर्चेत सहभागी करून घेणे, त्यांना प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन देणे, मतभिन्नतेचा आदर शिकविणे आणि संविधानिक मूल्यांचा व्यवहारात उपयोग करून दाखविणे आवश्यक आहे. घर, शाळा, महाविद्यालय आणि समाज या सर्व स्तरांवर संवादाची संस्कृती विकसित झाली तर लोकशाही वृत्ती अधिक मजबूत होईल. स्वतःचे मत मांडताना दुसऱ्याचे मत ऐकण्याची तयारी ही लोकशाहीची मूलभूत शिस्त आहे.नागरिकांच्या उदासीनतेवर मात करण्यासाठी शासन आणि सार्वजनिक संस्थांचीही जबाबदारी आहे. शासनाची माहिती सहज उपलब्ध असणे, सार्वजनिक सेवांमध्ये पारदर्शकता असणे, नागरिकांच्या तक्रारींवर वेळेवर कार्यवाही होणे आणि प्रशासन नागरिकांशी संवाद साधणारे असणे आवश्यक आहे. नागरिकांना वारंवार अनुभव येत असेल की त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होते, तर शासनावरील विश्वास कमी होऊ शकतो. त्यामुळे पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासन नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी आवश्यक आहे. लोकशाहीमध्ये नागरिकांनी शासनाला प्रश्न विचारणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच शासनाने त्या प्रश्नांना उत्तर देणेही महत्त्वाचे आहे.भारतीय लोकशाहीची शक्ती तिच्या व्यापक लोकसहभागात आहे. भारतातील निवडणुकांमध्ये कोट्यवधी नागरिक सहभागी होतात, विविध सामाजिक घटक राजकीय प्रक्रियेत प्रतिनिधित्व मिळवितात आणि शांततामय मार्गाने सत्तांतर घडते, ही मोठी उपलब्धी आहे. परंतु लोकशाहीची गुणवत्ता केवळ निवडणुकांच्या यशाने मोजता येत नाही. नागरिक वर्षभर सार्वजनिक प्रश्नांमध्ये किती सहभागी होतात, शासनाच्या कामकाजाबाबत किती जागरूक असतात, संविधानिक मूल्यांचा किती आदर करतात आणि सामाजिक न्यायासाठी किती संवेदनशील असतात, यावरही लोकशाहीचे यश अवलंबून असते.आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाच्या निमित्ताने त्यामुळे प्रत्येक नागरिकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे की आपण केवळ मतदार आहोत की सक्रिय नागरिक? आपल्या परिसरातील सार्वजनिक प्रश्नांची आपल्याला माहिती आहे का? आपण लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारतो का? शासनाच्या योजनांची माहिती घेतो का? चुकीची माहिती पुढे पाठविण्यापूर्वी तिची सत्यता तपासतो का? मतभिन्न असलेल्या व्यक्तीच्या मताचा सन्मान करतो का? संविधानाने दिलेल्या अधिकारांसोबत आपल्या कर्तव्यांची जाणीव ठेवतो का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे भारतीय लोकशाहीच्या वर्तमानाचे चित्र स्पष्ट करू शकतात.लोकशाही ही केवळ संसदेत किंवा विधानसभेत अस्तित्वात नसते. ती नागरिकांच्या विचारांत, वर्तनात आणि दैनंदिन कृतीत जिवंत राहते. घरात प्रत्येकाचे मत ऐकले जाते तेव्हा, शाळेत प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन दिले जाते तेव्हा, समाजात भिन्न मतांचा आदर केला जातो तेव्हा आणि सार्वजनिक संस्थांना जबाबदार धरले जाते तेव्हा लोकशाही मजबूत होते. नागरिकांची उदासीनता वाढली तर लोकशाहीच्या संस्था असूनही तिचा आत्मा दुर्बल होऊ शकतो. उलट, जागरूक आणि सक्रिय नागरिक असतील तर कोणतीही लोकशाही अधिक सक्षम बनू शकते.१५ सप्टेंबरचा आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन हा म्हणूनच केवळ लोकशाहीचा गौरव करण्याचा दिवस नसून तिच्या आरोग्याचे आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. भारतीय लोकशाहीसमोर अनेक आव्हाने आहेत; परंतु त्यावर मात करण्याची क्षमता भारतीय समाजातही आहे. नागरिकांनी मतदानाचा अधिकार जबाबदारीने वापरला, सार्वजनिक प्रश्नांमध्ये सक्रिय सहभाग घेतला, संविधानिक मूल्यांचे पालन केले, खोटी माहिती आणि द्वेषपूर्ण प्रचाराला नकार दिला, वंचितांच्या अधिकारांविषयी संवेदनशीलता दाखविली आणि शासनाला सातत्याने उत्तरदायी ठेवले तर लोकशाही अधिक मजबूत होईल. 'माझ्यामुळे काय फरक पडणार?' या उदासीन मानसिकतेऐवजी 'लोकशाही मजबूत करण्यासाठी माझी भूमिका काय?' हा प्रश्न प्रत्येक नागरिकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. कारण लोकशाहीचे भविष्य केवळ सत्ताधाऱ्यांच्या निर्णयांवर अवलंबून नसते; ते नागरिकांच्या जागरूकतेवर, सहभागावर आणि संविधाननिष्ठ वृत्तीवरही अवलंबून असते. नागरिक जागा झाला तर लोकशाही जागी राहते; नागरिक उदासीन झाला तर लोकशाहीची मुळे कमकुवत होऊ लागतात. म्हणूनच भारतीय लोकशाही अधिक सक्षम, समताधिष्ठित आणि न्यायपूर्ण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने केवळ मतदान करणारा मतदार न राहता जागरूक, विवेकी, प्रश्न विचारणारा आणि जबाबदार लोकशाही नागरिक बनणे, हीच आजच्या आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनाची खरी गरज आणि काळाची हाक आहे.




**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, मराठी व समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

**bagate.rajendra5@gmail.com**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १३ सप्टेंबर २०२६


# नवलेखकांना बळ देणारा : तिफण लेखक वाचक मेळावा



त्रैमासिक 'तिफण' तिफण वाचक चळवळ, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या तिफण लेखक - वाचक मेळाव्याचे उद्घाटक उद्घाटक मराठीतील ज्येष्ठ लेखक प्राध्यापक बसराज कोरे, संशोधन परिषदेचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे स्वागताध्यक्ष मा. श्री कल्याणराव खडके, मा. अवधूत नाना खडके, मा. दगडूजी भोणे, 'तिफण' त्रैमासिकाचे साक्षेपी संपादक डॉ. शिवाजी हुसे, प्राचार्य विजय भोसले, संशोधन परिषदेचे सर्व पदाधिकारी, विचारपीठावरील सर्व मान्यवर, या राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजक, त्यांचे सर्व सहकारी आणि उपस्थित सर्व साहित्यिक, रसिक बंधू भगिनींनो!तिफण वाचक चळवळ आणि संशोधन परिषदेने या मेळाव्याचे अध्यक्षपद देऊन आपण मला सन्मानित केले याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो!मित्रहो,जांबुवंत महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या जांबुवंतगड (जामखेड) या पावनभूमीत निसर्गरम्य वातावरणात हा मेळावा संपन्न होत आहे. ही विलक्षण आनंददायक घटना आहे. संशोधन परिषद आणि तिफण वाचक चळवळ सातत्याने ग्रामीण भागात जाणीवपूर्वक अशा मेळाव्यांचे आयोजन करून ग्रामीण भागातील लेखक कवींना व्यासपीठ मिळवून देण्याचं महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे. आजचा हा तिसरा मेळावा आहे. या आधी या चळवळीने ७ / ८ कविता महोत्सव, लेखकांसाठी कार्यशाळा, साहित्य लेखन स्पर्धा, पुस्तक प्रकाशने आणि साहित्य संवादाचे आयोजन केलेले आहे. ही चळवळ केवळ साहित्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. तिने सामाजिक कार्यात ही पुढाकार घेतलेला आहे. 'सुखना बचाव आंदोलन' असो की शेतकऱ्यांचे प्रश्न असो त्यासाठीही या चळवळीने पुढाकार घेऊन आंदोलनेही केले आहे. 'तिफण' हे सर्जनाचे प्रतीक आहे. या चळवळीतून अनेक लेखक कवी लिहिते झाले आणि नावारूपाला आलेत. अशा लेखक कवींसाठी मुगांसर, कवी कट्टा, कवी संमेलन यांचे आयोजन करून लेखक कवींना लेखनाची प्रेरणा दिली. 'तिफण' त्रैमासिकाच्या अनेक अंकातून या लेखक कवींचे लेखन प्रकाशित करून त्यांना लेखनासाठी बळ दिले.जालना जिल्ह्यात हा वाचक लेखक मेळावा संपन्न होत आहे. जालना जिल्ह्याची साहित्यिक परंपरा समृद्ध आहे. कवयित्री महदंबा या जिल्ह्यातील रासमगावच्या, कादंबरीकार आणि कथाकार रेखा बैजल, रुस्तुम अचलखांब, किशोर घोरपडे, प्रा. प्रल्हाद लुलेकर, उत्तम बावसकर, प्रा. भगवान काळे कवयित्री संजीवनी तडेगावकर, प्रा. राम कदम, प्रभाकर शेळके, शाहीर संभाजी भगत, कैलास भाले, सुदाम मगर, प्रा. बसराज कोरे, रावसाहेब ढवळे, पंढरीनाथ सारके, प्रा. जयराम खेडेकर, नाटककार राजकुमार तांगडे, कवी भीवराजजी आढाव, धोंडीपंत मानतकर, रा. ना. दौंड, श्रीमत ढवळे, कवी विठ्ठल कारटे, रामराव रिंदे, अशोक जेथे, पांडुरंग गिराम पत्रकार गुलाबराव पाटील डॉक्टर विक्रम लांडगे या लेखक कवींनी मराठी साहित्यात मोलाची भर घातलेली आहे. उर्मी, आशायन, आणि तिफण या त्रैमासिक नियतकालिकांनी दर्जेदार साहित्य प्रकाशित करून मराठी साहित्याला मोलाचे योगदान दिलेले आहे.जालना जिल्ह्यातील हिसोडा हे माझे जन्मगाव. एका रावल्या शेतकरी कुटुंबात माझा जन्म झाला. माझे वडील मराठवाडा मुक्ती संग्रामातील एक स्वातंत्र्य सैनिक. आपल्या मुलांनी शिकावं असं त्यांना मनापासून वाटायचं. माझ्या शिक्षणासाठी त्यांनी खूप खस्ता खाल्ल्या. प्रतिकूल परिस्थिती असल्यामुळे मी पैठण आणिवेजापूर येथे वस्तीगृहात राहून शिक्षण घेतलं. वेजापूरच्या विनायकराव पाटील महाविद्यालयात शिक्षण घेत असताना महाविद्यालयाचे प्राचार्य महाराष्ट्रातील ख्यातनाम लेखक रा. रं. बोराडे आणि प्रा. भास्कर चंदनशिव यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वांग्मयीन उपक्रम होत. या उपक्रमातून प्रेरणा घेऊन मी लिहिता झालो. ग्रामीण साहित्य चळवळीने मला लिहिण्याचं बळ दिलं. याच काळात शेतकरी संघटना जोरात होती. शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशींनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे बघण्याचं भान दिलं. शेतकरी हा माझ्या जिव्हाळ्याचा विषय. जागतिकीकरणामुळे सामान्य शेतकऱ्यांचं कंबरडं मोडलं. अस्मानी सुलतानी संकटामुळे जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी आत्महत्या करू लागला. शेतकऱ्याचं अभावग्रस्त जीवन मी अनुभवलं, हे जगणं मी माझ्या साहित्यातून मांडलं.आज आपल्या भोवतालचं वातावरण अतिशय चिंताजनक आहे. सामान्य माणसाला जगणं अवघड झालेलं आहे. जीवन मूल्यांची पडझड झालेली आहे, जात धर्माच्या नावावर राजकारण केलं जात आहे. शेतकरी शेतमजुराच्या प्रश्नाकडे कोणीही संवेदनशीलतेनं बघत नाही. शेती निसर्गावर अवलंबून असल्यामुळे शेती व्यवसाय मोडकळीस आलेला आहे. गावखेड्यात सुशिक्षित तरुण बेरोजगारीने त्रस्त आहेत. खेड्यात शेतकऱ्यांच्या तरुण मुला-मुलींचं लग्नाचं प्रश्न गंभीर झालेले आहेत. अनेक तरुण व्यसनाधीन होत आहेत. 'शेतकऱ्याच्या पोटी जन्म घेणं म्हणजे पाप आहे' असं या तरुण तरुणींना वाटत आहे. शेतकऱ्यांचे भवितव्य अधिकच चिंताग्रस्त होत आहे. रस्ते, उद्योग, शहर विकास या नावाखाली शेती आणि निसर्गावर माणूस अतिक्रमण करीत आहे. या प्रकल्पांमुळे शेती क्षेत्र घटत चालले आहे. याचे परिणाम पुढच्या पिढ्यांना भोगावे लागतील. त्यासाठी लेखकांनी भूमिका घेऊन लेखन केलं पाहिजे. लेखक, कवीने संवेदनशील असायला हवे. सामान्य माणूस केंद्रस्थानी मानून त्याचं जगणं आपल्या साहित्यातून अविष्कृत केलं पाहिजे. त्यासाठी लेखकाने भोवतालचं समाजजीवन डोळसपणे बघितलं पाहिजे. लेखकांनी चांगलं वाचन केलं पाहिजे. ललित लेखनाबरोबरच सामाजिक शास्त्रांची ही वाचन केलं पाहिजे. चांगल्या वाचनाने मनाची मशागत होते. जो समाज वाचतो, तो समाज प्रगती करतो. आज शिक्षणाची वाताहत झालेली आहे. मराठी सरकारी शाळा बंद पडत आहे. इंग्रजी शाळांचं पेव फुटलं आहे. गरीब मुलांना आणि मुलींना शिक्षण घेणं अवघड झालेलं आहे. शिक्षण खर्चिक झालेलं आहे. गरिबांची मुलं, मुली शिक्षणापासून वंचित राहत आहेत. ही परिस्थिती संवेदनशील लेखकाला अस्वस्थ केल्याशिवाय राहत नाही. सामान्य माणसाचं दुःख पाहिल्याने जे दुःखी होतात अस्वस्थ होतात तेच लेखक चांगलं साहित्य लिहू शकतात. लेखकांनी आपल्या लेखनातून समाजाला दिशा दिली पाहिजे.या मेळाव्यात दिवसभर सामान्य माणसांच्या प्रश्नांवर विचारमंथन होईल. त्यातून सामान्य माणसाचं जगणं उन्नत करण्याचा आपण संकल्प करू या. तिफण वाचक चळवळ आणि संशोधन परिषद यांनी मला या मेळाव्याचे अध्यक्षपद देऊन माझा सन्मान केला. त्याबद्दल मी आपल्या सर्वांचे आभार मानतो आणि माझ्या भाषणाला पूर्णविराम देतो... धन्यवाद !


**उत्तम बावसकर**
**छत्रपती संभाजीनगरदि.**
**मो. ७७४३९६२५६६**



